I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 173 B.N.S.S)**

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S. (पोलीस ठाणे):** माढा **Year (वर्ष):** 2026

   **FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0121 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 06/05/2026 21:57 वाजता

2. 

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

   1 **Day (दिवस):** बुधवार **Date from (दिनांक पासून):** 06/05/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 06/05/2026

   **Time Period (कालावधी):** प्रहर ४ **Time From (वेळेपासून):** 09:14 तास **Time To (वेळेपर्यंत):** 11:17 तास

   (b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 06/05/2026 **Time (वेळ):** 21:16 तास

   (c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 036 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 06/05/2026 21:16 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

   1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** दक्षिण, 10 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

      **(b) Address (पत्ता):** भांडीसंच वाटप केंद्र उपळाई बु,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** शैलेश चंद्रकांत पवार

**(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

**(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1984 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

**(h) Occupation (व्यवसाय):**

**(i) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलाप, माढा , सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलाप, माढा , सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9112121668

**7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | विनोद विजय गाडेकर | | | 1. Town/Village (शहर / गाव): रा उपळाई बु,ता माढा,जि,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): माढा,District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | दिनेश मनोहर वाघमारे | | | 1. Town/Village (शहर / गाव): रा माळीवस्ती उपळाई बु,ता,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): माढा,District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

**11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद दि.06/05/2026

मी शैलेश चंद्रकांत पवार, वय - 42 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद-पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर मो. नं. 9112121668 समक्ष फिर्याद देतो की,

मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर युनिट येथे माहे जुलै 2025 पासून पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

दि.16/04/2026 रोजी आम्ही कार्यालयात असताना श्री प्रशांत चौगुले, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर यांनी आम्हास त्यांचे कक्षामध्ये बोलावून घेतले आणि तक्रारदार श्री. शफीन जहाँगीर बागवान, रा. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांनी फोन करून त्यांचेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार दिली असून त्याअनुषंगाने आज रोजी त्यांचेसह जावून तक्रार नोंदवून त्यावरून पडताळणी करून पुढील कारवाई करण्याचे तोंडी आदेश दिले. त्यानुसार आम्ही दि.16/04/2026 रोजी आमचेकडील अंमलदार यांचे मार्फत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, सोलापूर या कार्यालयास पंच मिळणेबाबत पत्रव्यवहार करून दोन शासकिय पंच उपलब्ध करून घेतले. सुमारे 13:30 वा. चे सुमारास 1) श्री. संजीव परमेश्वर जावळकोटी, पद- उप कृषी अधिकारी, नेम. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, 2) श्री. राहूल जालंधर भोसले, पद- सहा. कृषी अधिकारी हे दोन्ही पंच साक्षीदार ला.प्र.वि. सोलापूर या कार्यालयात आमच्या समक्ष हजर झाले. त्यावेळी आम्ही दोघांना आमची व पोलीस उप अधीक्षक श्री. प्रशांत चौगुले यांची ओळख करून देवून तक्रारदार श्री. शफीन जहाँगीर बागवान, रा. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उपळाई (बु.), ता. माढा येथे जाऊन पडताळणी व पुढील कारवाई करणेकामी पंच म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का ? अशी विचारणा करता, दोघांनी पंच म्हणून काम करण्यास संमती दिली. त्यानंतर आम्ही आमच्या कार्यालयातील पोहेकॉ/571 मुल्ला, पोहेकॉ/ 1616 जाधव व चालक पोकॉ/2026 श्रीराम यांना बोलावून घेतले आणि दोन्ही पंचांची ओळख करून देऊन गोपनीय कामकाजासाठी बाहेर जायचे असल्याचे सांगुन त्याकरीता आवश्यक सर्व साहित्य शासकीय वाहनात घेण्यास सांगितले. त्यानुसार गोपनीय कामाकरीता आवश्यक व्हाईसरेकॉर्डर, मेमरीकार्ड, लॅपटॉप, प्रिन्टर, सील, न्थ्रासीन पावडर, अल्ट्राव्हायोलेट दिवा इ. सर्व साहित्य ला.प्र.वि. कडील शासकीय वाहन एम.एच.12 यु.सी 4108 या वाहनामध्ये ठेवण्यात आले. त्यानंतर 14:00 वा. चे सुमारास शासकीय वाहनातून आम्ही, पोलीस उपअधीक्षक चौगुले, दोन्ही पंच, पथकातील अंमलदार असे सर्वजण न्टी करप्शन कार्यालय सोलापूर येथून रवाना झालो. आम्ही रंगभवन, बाळे, मोहोळ, अनगर मार्गे उपळाई (बु) ता. माढा गावाचे अलीकडे मोहोळ - माढा रोडवरील हॉटेल 7/12 चे थोडे पुढे रस्त्याच्या कडेला 15:20 वा. चे सुमारास जाऊन पोहोचलो.

दरम्यान पोलीस उपअधीक्षक चौगुले यांनी तक्रारदार बागवान यांना फोन करून उपळाई गावाचे अलीकडे मोहोळ - माढा रोडवरील हॉटले 7/12 जवळील रोडवर येण्यास सांगितले होते त्याप्रमाणे काही वेळातच ते त्यांचेकडील मोटार सायकल वरून त्याठिकाणी आले. त्यावेळी आम्ही पथकातील

अंमलदारांना खाली उतरून थोडे बाजूस थांबण्यास सांगितले. त्याप्रमाणे सापळा पथक शासकीय वाहनातून उतरुन काही अंतरावर असलेल्या झाडाखाली जावून थांबले. त्यानंतर तक्रारदार बागवान यांना शासकीय वाहनामध्ये बोलावून त्यांना माझी, पोउपअधी श्री. चौगुले व दोन्ही शासकीय पंचांची ओळख करून दिली. त्यानंतर आम्ही पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता व त्यांची तक्रारीबाबत थोडक्यात हकीकत विचारली असता त्यांनी त्यांचे नाव श्री. शफीन जहाँगीर बागवान, वय 42 वर्षे, व्यव. पेंटर/ हेल्पर, राह. सोमवार पेठ, पांडे चौक, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापुर असे असल्याचे सांगून, ते नोंदणीकृत बांधकाम कामगार असल्याचे सांगुन त्यांनी महाराष्ट्र शासनाचे कामगार कल्याण मंडळाकडून भांडी संच मिळण्यासाठी ऑनलाईन अर्ज केलेला असून मंजूर भांडी संच देणेसाठी मौजे उपळाई येथील भांडी वितरण केंद्र येथील ऑपरेटर 500/- रू लाचेची मागणी करीत असून त्यांच्याविरूध्द योग्य ती कारवाई करण्यात यावी अशा आशयाची तक्रार सांगितली. त्यांना त्यांची सविस्तर तक्रार स्व:हस्ताक्षरामध्ये लिहुन देणेस सांगितले असता त्यांनी त्यांचे 8 वी. पर्यंतचे शिक्षण झालेले असून त्यांना व्यवस्थित लिहीता येत नाही परंतु व्यवस्थित वाचता येत असलेचे सांगितलेने पंच क्र. 01 जावळकोटी यांचेकरवी तक्रारदार यांचे सांगणेप्रमाणे तक्रार लिहून घेतली. तक्रारदार यांनी सदर लेखी तक्रार वाचून त्याची खात्री झाल्यावर त्यावर सही केली. त्यानंतर सदरची तक्रार आम्ही व दोन्ही शासकीय पंचांनी वाचून त्यावर सहया केल्या.

तक्रारदार शफीन बागवान यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी पंच क्र.1 म्हणुन संजीव जावळकोटी व पंच क्र. 2 म्हणुन राहूल भोसले यांनी काम पाहण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही तक्रारदार बागवान, दोन्ही पंच साक्षीदार यांना आमचेकडील सोनी कंपनीचे IC RECORDER ICD-UX570F 5V SONY CORP. MADE IN CHINA 1080939 व्हॉईस रेकॉर्डर व NEXUS कंपनीचे 08 जीबीचे एक नवीन मेमरीकार्ड दाखविले. सदर मेमरीकार्डचे वर्णन पाहता त्याच्या पुढील बाजूस NEXUS micro 10 SD HC 8GB मागील बाजुस NKS-XY1/26 CE MMC08AX215F-TO DLD XY 2601 MADE IN TAIWAN असे असून त्याचा वापर व उपयोग समजावून सांगितला. त्यानंतर आम्ही, तक्रारदार व पंच यांचे समक्ष सदर मेमरीकार्ड व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घालून लॅपटॉपला लावले आणि त्यामध्ये कोणतेही ध्वनीमुद्रीत फाईल नसल्याची समक्ष खात्री करुन दिली आणि सदरचे मेमरीकार्ड आज रोजीचे पडताळणी कारवाईकरीता वापरत असल्याचे सांगितले.

त्यानंतर आम्ही आणखीन एक NEXUS कंपनीचे 08 जीबीचे नवीन मेमरीकार्ड दाखविले. त्याचे पुढील बाजूस NEXUS micro 10 SD HC 8GB मागील बाजुस NKS-XY1/26 CE MMC08AX215F-TO DLD XY 2601 MADE IN TAIWAN असे वर्णन असून सदर मेमरीकार्ड पोलीस उपअधीक्षक चौगुले यांचेकडील सॅमसंग कंपनीचे गॅलेक्सी A.06 या शासकीय मोबाईलमध्ये टाकून मोबाईलचे स्टोरेज पाथ एस.डी कार्ड सिलेक्ट केले, जेणेकरून निवेदनाचे व्हिडीओ चित्रीकरण करताना चित्रीकरणाचे फाईल मेमरीकार्डमध्ये जतन होईल. त्यानंतर तक्रारदार बागवान व दोन्ही पंचांचे पडताळणीपुर्व निवेदन 16:08 वा. चे सुमारास व्हॉईसरेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करून घेण्यात आले. तक्रारदार आणि पंचांची निवेदने घेताना त्याचे व्हिडीओ चित्रीकरण वर नमुद मोबाईलच्या माध्यमातून पोह/जाधव यांनी केले.

त्यानंतर आम्ही व पोलीस उप अधीक्षक चौगुले यांनी तक्रारदार बागवान व पंच क्र.1 जावळकोटी यांना पडताळणीच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन व्हाईस रेकॉर्डर चालू करून होल्ड मोडवर

ठेवून तक्रारदार यांचे नेसते शर्टाचे आतमध्ये बनियनचे आत गळयात अडकवून 16:18 वा. चे सुमारास तक्रारदार यांची हिरो एचएफ डिलक्स मोटार सायकल एम.एच. 13 सी. के. 9289 वरून भांडीवाटप केंद्र, उपळाई (बु) येथील ऑपरेटर यांची भेट घेण्यासाठी रवाना केले. काहीवेळानंतर तक्रारदार व पंच नं 01 जावळकोटी हे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी 16.47 वा परत आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचे गळयातील व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार बागवान यांना भांडी वितरण केंद्र येथील ऑपरेटर यांची भेट घेण्याकरीता गेल्यानंतर काय घडले याबाबतची हकीकत आमचे व पंचासमक्ष कथन करण्यास सांगितले असता तक्रारदार बागवान यांनी सांगितले की, “मी व पंच क्र.1 जावळकोटी दोघे माझे मोटारसायकलवरून उपळाई (बु.) येथील भांडी वितरण केंद्र येथे जावून तेथे आमची मो. सायकल बाहेरच गेटजवळ लावून पायी चालत आतमध्ये गेलो असता तेथे दोन कर्मचारी बसलेले दिसले. त्यापैकी एक ऑपरेटर हे मला यापूर्वी मोबाईल नंबर दिलेले व त्यांचेशी फोनवर बोलणे झालेले ऑपरेटर गाडेकर हे होते. त्यामुळे मी त्यांना नमस्ते म्हणून बोलण्यास सुरवात केली. त्यावेळी त्यांनी या भाई असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना भांडी वाटपाचा संच असे म्हणून माझे नावे मंजूर झालेले भांडी संचाबाबत विचारले असता त्यांनी त्या दिवशी तुम्ही आलेलाव काय.. असे विचारले. त्यावर मी हा.. बागवान असे म्हणून माझे भांडी संचाबाबत चर्चा करीत असताना त्यांनी त्यांचे मोबाईलवरून कोणास तरी फोन लावून दिनूभाऊ… त्या दिवशीचे ते बार्शीचे जे हे हायत ते हिथ आलेत असे म्हणून मी आलेचे सांगितले. त्यानंतर त्यांनी तुम्ही फोन करून यायला पाहिजे होत असे म्हणाले त्यावर मी असं. फोनवरच चर्चा चालू हाय .. मग तुम्हीच म्हणले समक्ष या.. म्हणून आज समक्ष आलो असे सांगितले. त्यावेळी त्यांनी नाही काय विषय काय हाय माहितीय का.. मी हाय हितला ऑपरेटर.. म्हणजे ऑपरेटरच हाय आम्ही.. हित जी होती का पोर त्यांच्या बी खरच काय हातात नाही. बर आता हाय विषय किती .. किती रूपये मागत होती ती.. असे म्हणाले. त्यावर मी पहिले बाराशे म्हणले होते पुन्हा आठशे म्हणले.. सेल्प हाय तर पाचशे तर दयावेच लागल म्हणले मला.. असे सांगितले. त्यावर त्यांनी नाही.. घेतय बरका पाचशे रूपय घेतय आता सेल्प असल तरीबी ती सातशे आठशे रूपय घेतय.. असे म्हणाले. त्यावर मी त्यांना आता काय म्हणतेत.. किती मागतेत ते.. असे म्हणून लाच रक्कमेचा खुलासा करणेसाठी विचारणा केली असता त्यांनी ती पोर आता सगळी टीम सोलापूरला हाय, पेटया संपलेत असे कारणे सांगून ज्या दिवशी बी कोण बार्शीच हिकड येईल त्या दिवशी तुम्हाला मी ते बार्शीच नियोजन करतो.. हयंना काही पाचशे मागतेत तर पाचशे दिवून टाका.. मी तुम्हाला ज्या दिवशी हित बार्शीच कोण येईल.. म्हणजे सामान न्यायला त्यात एक तुमची पेटी देतो. असे म्हणून मला महाराष्ट्र शासनाचे कामगार विभागाकडून मंजूर असलेला भांडी संच देणेसाठी 500/- रू लाचेची मागणी केली. त्यानंतर त्याअनुषंगानेच चर्चा केली त्यावेळी त्यांनी सध्या भांडी किट नसल्याचे सांगुन एक चार दिवसांनी फोन लावा.. किंवा भांडी आल की मीच तुम्हाला लावतो.. असे सांगुन भांडी आल्यावर फोन करतो व ॲडजेस्ट करून देतो असे सांगितले. त्यानंतर मी व पंच क्र. 1 असे तेथून बाहेर येवून माझे मोटार सायकलवरून पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो.” याप्रमाणे संपुर्ण घडलेली हकिकत सांगितली.

त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 जावळकोटी यांना ते तक्रारदार बागवान यांच्यासह भांडी वाटप केंद्र उपळाई येथील ऑपरेटर यांना भेटण्यास गेल्यानंतर काय घडले याची हकिकत सांगण्यास सांगितले

असता, त्यांनी देखील तक्रारदार यांनी सांगितलेप्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर आम्ही व्हॉईसरेकॉर्डर लॅपटॉपला जोडून पाहिले असता, मेमरीकार्ड मध्ये फाईल नं. 02 येथे 260416_1618 या शिर्षकाखाली संभाषण ध्वनीमुद्रीत झाल्याचे दिसुन आले. सदरवेळी आम्ही संभाषणातील आवाज तक्रारदार बागवान यांच्याकडून ओळखून घेतला व पंचासमक्ष फॉरवर्ड-बॅकवर्ड करून रेकॉर्डींग फाईलमधील संभाषण ऐकुन झालेल्या संभाषणाची खात्री केली असता वर प्रमाणे संभाषण झाल्याचे स्पष्ट झाले.

सदरवेळी आम्ही तक्रारदार बागवान यांना पडताळणी दरम्यान भांडी वाटप केंद्र उपळाई येथील ऑपरेटर यांनी तक्रारदार हे त्यांना भेटण्यास गेल्यावर त्यांनी त्यांचे मोबाईलवरून कोणास तरी फोन लावून दिनूभाऊ... त्या दिवशीचे ते बार्शीचे जे हे हायत ते हिथ आलेत असे म्हणून तक्रारदार आलेचे सांगितल्याचे दिसून येत असून सदर दिनूभाऊ नावाचा व्यक्ती कोण आहे याबाबत विचारणा करून दिनूभाऊचीही पडताळणी करावी लागेल असे सांगितले. त्यावेळी तक्रारदार बागवान यांनी त्यांना दिनूभाऊ कोण आहे. याबाबत काहीही माहिती नसल्याचे सांगून आज रोजी उपळाई येथील भांडी वाटप केंद्रावर इतर कोणीही कर्मचारी नसून ते सोमवारपासून कामावर येतील. परंतु मी दिनूभाऊ याची पडताळणी करणेस पुन्हा गेल्यास त्यांना माझा संशय येवून ते लाच रक्कमेबाबत काहीएक बोलणार नाहीत अगर लाच रक्कमही घेणार नाहीत. त्यामुळे आज रोजीचे पडताळणीमधील ऑपरेटर गाडेकर

यांनी एक चार दिवसांनी फोन लावा... भांडी आल की मीच तुम्हाला लावतो असे सांगितलेले असलेने त्याचा फोन आलेवर त्याचेवर सापळा कारवाई करावी. त्याच वेळी मी त्याला सांगून दिनूभांऊ यांना भेटून बोलणी करतो असे सांगितले. त्यावरून पुढील कारवाई करावी अशी विनंती केली. त्यावरून उपळाई येथील भांडी वितरण केंद्रावरील ऑपरेटर गाडेकर यांनी फोन केलेनंतरच त्यांच्याविरूध्द पुढील कारवाई करण्याचे ठरवून दि. 16/04/2026 रोजीची सापळा कारवाई स्थगित करण्यात आली. त्यानंतर तक्रारदार यांना गोपनीयता राखण्याच्या सुचना देवून तात्पुरते मोकळीक केले व आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक असे न्टी करप्शन ब्युरो कार्यालय, सोलापूर येथे येवून झाले कारवाईबाबतचा सविस्तर पंचनामा पुर्ण केला आहे. दि. 05/05/2026 रोजी तक्रारदार यांचा मला फोन आला व त्यांनी सांगितले की, भांडी संच आले असल्याची माहिती मला मिळाली असून मी उदईक दि. 06/05/2026 रोजी सकाळी 09:30 वा. सुमारास उपळाई(बु.) येथे भांडी संच घेण्याकरीता जाणार आहे तरी आपण पुढील कारवाई करीता तेथे यावे असे सांगितल्याने आज दि.06/05/2026 रोजी दोन्ही शासकीय पंच, आम्ही स्वत:, पोउपअधी श्री चौगुले, पोह/571 मुल्ला, पोहेकॉ/1616 जाधव व चालक पोकॉ/2026 श्रीराम असे आम्ही सर्वजण शासकीय वाहन एम.एच 12 यु.सी 4108 सापळा कारवाईकरीता आवश्यक सर्व साहित्य सोबत घेऊन सकाळी 07.00 वा चे सुमारास उपळाई (बु) कडे रवाना झालो आणि 08.30 वा चे सुमारास यापुर्वी तक्रारदार यांना भेटलेले मोहोळ - माढा रोडवरील हॉटेल 7/12 चे थोडे पुढे रस्त्याच्या कडेला जाऊन तक्रारदार यांना भेटलो. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने भांडी वितरण केंद्र उपळाई (बु) येथे ऑपरेटर गाडेकर कधी येणार आहेत याची खात्री करण्यासाठी आमचे सुचनेवरुन तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक 9850707865 वरुन ऑपरेटर गाडेकर याचे मोबाईल क्रमांक 8956971314 वर 09.14 वा दरम्यान कॉल केला असता त्यांनी तक्रारदार यांना भांडीवाटप केंद्र येथे येत असल्याचे सांगितले. त्यानंतर ऑपरेटर गाडेकर

यांचेवर उपळाई (बु) येथील भांडीसच वापट केंद्र येथे सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरले त्यानंतर मोहोळ - माढा रोडवरील हॉटेल 7/12 चे थोडे पुढे रस्त्याच्या कडेला शासकीय वाहनांमध्ये तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांचे क्रमांक लिहून घेणे, तक्रारदार व दोन्ही पंचांना न्थ्रासीन पावडरची माहिती देऊन त्याचे प्रात्यक्षिक करणे व हजर केलेल्या नोटांना पावडर लावणे इ. सापळापुर्व कारवाई करून, सापळा कारवाईच्या अनुषंगाने तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील अंमलदारांना आवश्यक त्या सुचना देण्यात आल्या. त्यानंतर तक्रारदार व दोन्ही पंचांचे सापळा कारवाईच्या अनुषंगाने दि.16/04/2026 रोजी पडताळणीवेळी वापरण्यात आलेल्या वर नमुद वर्णनाचे मेमरीकार्डमध्ये 09.17 वा व्हॉईसरेकॉर्डरव्दारे निवेदने रेकॉर्ड करून घेतले. सदरचे निवेदन रेकॉर्ड करून घेताना पोह/1616 जाधव यांनी शासकीय मोबाईलमधून दि.16/04/2026 रोजी पडताळणी कारवाईत निवेदन घेतेवेळी व्हिडीओ चित्रीकरणासाठी वापरलेले वर नमुद वर्णनाचे मेमरीकार्डमध्ये व्हिडीओ चित्रीकरण केले. त्यानंतर तक्रारदार बागवान व पंच क्र.1 जावळकोटी यांना ऑपरेटर गाडेकर यांची भेट घेण्यासाठी 09.38 वा भांडीवाटप कैंद्र उपळाई (बु) येथे रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही स्वतः, पोउपअधी श्री. चौगुले, पंच क्र.2, पोह/571 मुल्ला, पोह/1616 जाधव व चालक पोकॉ/2026 श्रीराम असे शासकीय वाहनातून उपळाई (बु) दिशेने रवाना झालो. सापळा कारवाईदरम्यान तक्रारदार बागवान व पंच क्र.1 जावळकोटी हे दोघे उपळाई (बु) येथील भांडी वाटप कैंद्राचे गेटवर गेले त्यानंतर ते भांडीवापट कैंद्रचे दक्षिणेस रोडचे बाजूस असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उपळाई (बु)चे आवारात गेले. त्यानंतर आम्ही व सापळा पथक त्यांचे पाठीमागे जावून कोणाला संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावून थांबलो. त्यानंतर बराचवेळा झाल्यानंतर तक्रारदार बागवान व पंच नं 1 जावळकोटी हे पुन्हा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उपळाई (बु) येथून निघून ते रोडचे पलिकडे उत्तरेस असलेले भांडीसंच वापट कैंद्राचे गेटवर दुचाकी वाहन पार्क करुन गेट मधून आतमध्ये गेले. त्यानंतर काहीवेळाने तक्रारदार यांनी त्यांचा डावा हात डोक्यावरून फिरवून लाच स्वीकारल्याचा पूर्वनियोजित इशारा दिला. त्यावेळी त्या परिसरात सापळा लावून थांबलेले आम्ही सर्वजण भांडी वाटप कैंद्राच्या बाहेर जावून दोन इसमांना 11.17 वा चे सुमारास ताब्यात घेतले व त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांची नावे 1) विनोद विजय गाडेकर, वय- 37 वर्षे पद- ऑपरेटर, भाडीसंच वाटप कैंद्र, उपळाई (बु), ता. माढा, जि. सोलापूर रा. उपळाई (बु), ता. माढा, जि. सोलापूर व 2) दिनेेश मनोहर वाघमारे, वय - 23 वर्षे, पद- ऑपरेटर, भाडीसंच वाटप कैंद्र, उपळाई (बु), ता. माढा, जि. सोलापूर रा. माळीवस्ती उपळाई (बु), ता. माढा, जि. सोलापूर असे असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही लाच रक्कमेबाबत विचारणा केली असता त्या दोघांनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याने आम्ही पंच न. 1 जावळकोटी यांना सदरची लाचरक्कम कोणी स्विकारली याबाबत विचारणा केली असता ऑपरेटर वाघमारे यांनी स्विकारली असल्याचे सांगितले. त्यानंतर पंच नं 2 गणेचारी यांचेकरवी ऑपरेटर वाघमारे यांचे पॅन्टचे पाठीमागील उजव्या बाजूचे खिशात ठेवलेली लाच रक्कम ताब्यात घेण्यात आली. त्यानंतर पंच क्र.2 गणेचारी यांनी सदर नोटांच्या क्रमांकाची तपासणी केली असता ते तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांशी तंतोतंत जुळून आले. त्यानंतर सदरठिकाणी कृत्रिम अंधार करून ऑपरेटर वाघमारे यांच्या दोन्ही हाताची, नेसते पॅन्टचे पाठीमागील उजव्या बाजूचे खिशाचे व त्यांच्या ताब्यातून मिळालेल्या नोटांची अल्ट्रा व्हायोलेट दिव्याच्या प्रकाशात तपासणी करता त्यावर न्थ्रासीन पावडरची हिरवट चकाकी दिसून आली. त्यानंतर सदर ठिकाणीच पुढील सर्व

प्राथमिक तपासणी करण्यात आली. त्यानंतर भांडीवापट संच केंद्राची पाहणी केली असता ते स्वामी विवेकांनद बालकाश्रम, उपळाई (बु) असल्याचे दिसून आले. आम्ही, पोउपअधी श्री. चौगुले, दोन्ही पंच, दोन्ही आरोपी व सापळा पथक असे शासकीय विश्रामगृह माढा येथे आलो. त्यानंतर आम्ही सापळाकारवाई दरम्यान तक्रारदार बागवान यांना भांडी वितरण केंद्र येथील ऑपरेटर गाडेकर यांची भेट घेण्याकरीता गेल्यानंतर काय घडले याबाबतची हकीकत आम्हा व पंचासमक्ष कथन करण्यास सांगितले असता तक्रारदार बागवान यांनी सांगितले की मी व पंच 1असे माझेकडील मोटार सायकलवरून हॉटेल 7/12 चे जवळून रवाना होवून उपळाई बु. येथील भांडी संच वाटप केंद्र येथे गेलो असता सदर केंद्राचे गेटला कुलुप लावलेले दिसलेने मी ऑपरेटर गाडेकर यांना फोन करून मी आलेचे सांगितले. त्यांवेळी त्यांनी त्या समोरच असलेले कमानीमधील शाळेत बसा मी दहा मिनीटात येतो असे सांगितलेने मी व पंच असे ग्रामपंचायत जवळील शाळेत जावून थांबलो. बराच वेळ होवूनही गाडेकर हे न आल्याने मी त्यांना 4- 5 वेळा फोन लावला परंतु त्यांनी फोन उचलला नाही. त्यानंतर मी त्यांची वाट पाहत तेथेच थांबून राहीलो. पुन्हा काही वेळांनी ऑपरेटर गाडेकर यांना फोन लावला असता त्यांनी फोन उचलून ओ थांबा एक पंधरा मिनीट.. याय लागलीती खाली याय लागलय.. फोन उचल नायती. असे सांगितले. त्यानंतर बराच वेळ होवूनही तेथे कोणीच आले नसलेने मी पुन्हा 5- 6 वेळा ऑपरेटर गाडेकर यांना फोन केला परंतु त्यांनी आताही फोन उचलला नाही. त्यानंतर गाडेकर यांनी मला एक मोबाईल नंबर चा एसएमएस केला. त्यनंतर मी त्या नंबरवर फोन केला असता तो त्यंनी उचलला त्यांना मी गाडेकर सरांनी नंबर दिलता तुमचा असे सांगितले व भांडी घ्यायसाठी आलेचे सांगितले. त्यावेळी त्यांनी बर आलो असे सांगितले. काही वेळांनी मी पुन्हा त्याच नंबरवर फोन केला असता ते शाळेपशी आल्याचे सांगितले. तेव्हा मी त्यंना तिकडे येवू का असे विचारले असता त्यांनी काय हित गेट समोर हाय मी आलो. असे सांगितले. त्यानंतर मी व पंच 1 असे माझे मोटारसायकलीवरून पुन्हा भांडी वाटप केंद्राचे गेट जवळ गेलो. तेथे 4-5 इसम गेट उघडत होते. त्यावेळी मी व पंच गेटजवळ गेलो असता त्यतील एकाने फक्त तुम्ही या आत असे सांगितले. त्यामुळे पंच 1 हे गेटजवळच थांबून रहीले. तेथील इसमांचे मागे मी भांडी वाटप केंद्रात गेलो. त्यानंतर पंच न.1 हे माझे पाठोपाठ मागे आत आले. तेथे दुसरे एका व्यक्तीने मला नाव वगैरे विचारून घेवून रजिस्टरवर माझे नाव वगैरे नोंदवून घेतले. त्याच दरम्यान मी यापूर्वी भेटलेले ऑपरेटर गाडेकर व त्याचे बरोबर आणखी एक इसम तेथे आले. त्यादरम्यान त्यांचेत त्यांचे कामाचे अनुषंगाने काही बोलणे झाले त्यावेळी गाडेकर यांचेसोबत आलेला इसम हा दिनू असलेचे मला समजले. त्यादरम्यन माझे नाव नोंदवून घेणारे व्यक्तीने मला हं हाय का.. हिकड बघा आताही .. हित मांडल नाही आता आपण बरोबर हाय का.. हाता सगळ आम्हाला जुळवाय लागतयतुमच.. दयायला लागलो होतो बॉक्सत्यदिवशीतर तुम्ही.. त्यावेळी दिनेश यांने हेलपाटाकरून घ्याचा होता. असे म्हणाला. त्यावेळी मी हं. ते पैशासाठी राहील होत ना ती. असे सांगितले असता. दिनेश यांनी तुम्हाला काय म्हणल होत. असे म्हणाला. त्यानंतर आमचेत काही चर्चा झाली त्यादरम्यानच ऑपरेटर गाडेकर यांनी दया हयंला पाचशे.. असे सांगितले त्यावेळी मी माझे पॅन्टचे उजवे बाजूच्या खिशात ठेवलेली लाच रक्कम काढून गाडेकर सांगितलेप्रमाणे तेथील दिनेश याचे समोर धरली असता त्यंनी ती त्यचे उजवे हाताने स्विकारून ती दोन्ही हाताने मोजून त्याचे पॅन्टचे पाठीमागील उजवे बाजूचे खिशात ठेवली. त्यावेळी त्यांनी देबॉक्स... चांगला काढ बॉक्स हयांना लांब जायचाय.. असे

म्हणून तेथील इतर कामगारास बॉक्स देण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी जावून बॉक्स घेण्यास जात असताना त्याच वेळी मी माझा डावा हात डोक्यावरून फिरवून लाच मागणीचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी आपण व सापळा पथक तेथे गेटमधून आत आले. त्याचवेळी मी ऑपरेटर गाडेकर यांना हां..गाडेकर साहेब हयंना दिलेत पाचशे.. असे म्हणून लाच रक्कम दिनेश यांचेकडे दिलेचे सांगितले त्यावर त्यांनी काय अडचण नाही आता जावा.. असे सांगितले. त्यानंतर आपण सर्वजण तेथे येवून ऑपरेटर गाडेकर व ऑपरेटर दिनेश यास ताब्यात घेतले अशी संपुर्ण घडलेली हकिकत सांगितली. त्यानंतर आम्ही सापळा कारवाईत पंच क्र. 1 जावळकोटी यांना ते तक्रारदार बागवान यांच्यासह भांडी वाटप केंद्र उपळाई येथील ऑपरेटर यांना भेटण्यास गेल्यानंतर काय घडले याची हकिकत सांगण्यास सांगितले असता, त्यांनी देखील तक्रारदार यांनी सांगितलेप्रमाणे मिळतीजुळती घडलेली हकीकत सांगितली. सदरठिकाणी संभाषणाचा उतारा काढून सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा करण्यात आला. तरी दि.16/04/2026 रोजी तक्रारदार श्री. शफीन जहाँगीर बागवान, रा. बार्शी, ता. बार्शी, जि सोलापूर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.16/04/2026 रोजी 16.08 वा. पासून 16.47 वा. चे दरम्यान करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईदरम्यान भांडीसंच वाटप केंद्र उपळाई (बु) येथील ऑपरेटर गाडेकर यांनी तक्रारदार यांना भांडीसंच वाटप केंद्र उपळाई (बु) येथील ऑपरेटर दिनेश वाघमारे यांचेकरीता महाराष्ट्र शासनाचे कामगार विभागाकडून बांधकाम कामगारांना मोफत दिले जाणारा मंजूर झालेला भांडी संच देणेसाठी 500/- रू लाच मागणी केली. तसेच दि.06/05/2026 रोजी 09.14 वा. पासून 11.17 पर्यंत या कालावधीमध्ये करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान ऑपरेटर विनोद गाडेकर यांचे समक्ष सांगणेवरुन ऑपरेटर दिनेश वाघमारे यांनी सदरची 500/- लाच रक्कम स्विकारली म्हणून विनोद विजय गाडेकर, वय- 37 वर्षे पद- ऑपरेटर, भाडीसंच वाटप केंद्र, उपळाई (बु), ता. माढा, जि. सोलापूर रा. उपळाई (बु), ता. माढा, जि. सोलापूर व दिनेेश मनोहर वाघमारे, वय - 23 वर्षे, पद- ऑपरेटर, भाडीसंच वाटप केंद्र, उपळाई (बु), ता. माढा, जि. सोलापूर रा. माळीवस्ती उपळाई (बु), ता. माढा, जि. सोलापूर यांचेविरूध्द मी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 अ, 12 प्रमाणे सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद देत आहे. माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणेप्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

समक्ष

हा फिर्यादी जबाब दिला. पोलीस ठाणे अंमलदार माढा पोलीस ठाणे

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** rohit chandrasen shinde (पोलीस उपनिरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** rohit chandrasen shinde

**Rank (हुद्दा):** SI (Sub-Inspector)

**No. (क्र.):** DGPRCSM8803

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्मतारीख / वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(से.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1989 | | - | | चेचक: क्र. |
| 2 | पुरुष | 2003 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्यंग / वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)